जनसंपर्क कक्ष
16 DEC 2018
महाराष्ट्र टाईम्स
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शेतीचे स्वास्थ्य टिकवायला हवे

**म. टा प्रतिनिधी,** कोल्हापूर

'मानवाच्या विकासात शेतीचा मोठा वाटा आहे. शेती व्यवस्थेच्या विकासासाठी त्याचा गांभीर्याने अभ्यास करणे गरजेचे आहे. गेली कित्येक वर्षापासून आपल्या देशातील लोकांनी शेतीचे स्वास्थ्य टिकवून ठेवले आहे. यासाठी ग्रामीण व्यवस्था सक्षम करण्याची आवश्यकता आहे,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयातील भूगोल विभागाच्यावतीने आयोजित एक दिवशीय आंतरविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी शनिवारी बोलत होते. स्कॉट कफोरा, सॅलिस्बरी विद्यापीठाचे प्रा. डॉ. प्रवीण सप्तर्षी प्रमुख उपस्थित होते. कार्यशाळेत 'शेती आणि ग्रामीण विकासः क्षेत्रीय समस्या, आव्हाने आणि दृष्टिकोन' या विषयावर विविध सत्रात चर्चा करण्यात आली.



श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयातील भूगोल विभागाच्यावतीने आयोजित एक दिवशीय आंतरविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते शहाजी छत्रपती महाविद्यालयात बोलताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.

## राष्ट्रीय चर्चासत्रात कुलगुरू डॉ. शिंदे यांचे प्रतिपादन

कुलगुरू शिंदे म्हणाले, 'छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात देखील शेतीविषयक पत्रे लिहिलेली आढळतात. शिवाजी महाराजांचे शेतीविषयक धोरण प्रागतिक होते. त्याकाळी शेती व्यवस्था टिकून राहण्यासाठी राजव्यवस्था शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभी राहत असे. त्यामुळे आलेल्या दुष्काळाला शेतकरी खंबीरपणे तोंड देत होता. इंग्रजांच्या भारतातील आगमनानंतर भारतीय शेती व्यवस्थेचे फार मोठे नुकसान झाले. त्यातून नवीन जमीनदार-सावकार असा शोषण करणारा वर्ग निर्माण झाला. खऱ्या अर्थाने शेतीचा विकास करायचा असेल तर ग्रामीण भागातील जीवन सुधारले पाहिजे. ग्रामीण शेती किफायतशीर करण्यासाठी मातीत हात घालून शेती करायला हवी. शेतीच्या विकासात अन्नाची होणारी नासाडी हे घटक अडथळा ठरतात.'

याप्रसंगी गोकुळचे अध्यक्ष विश्वास पाटील यांच्या हस्ते ई- जर्नलचे प्रकाशन करण्यात आले. शिवाजी विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर मोरे यांच्या हस्ते मराठी पत्रकाचे प्रकाशन झाले. यावेळी विजय बोंद्रे, बाळासाहेब खाडे, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, डॉ. डी. एल. काशिद- पाटील, प्रा. आर. एम. कांबळे उपस्थित होते.

पुढारी

# गावांचा विकास झाल्यास शेतीचे प्रश्न सुटतील

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : शहाजी छत्रपती महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मानवाचा विकास शेतीमुळेच झाला आहे. गावात विकासाचे आनंदी वातावरण तयार झाले तर शेतीचे अनेक प्रश्न सुटतील, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

शहाजी छत्रपती महाविद्यालयात 'शेती आणि ग्रामीण विकास : क्षेत्रीय समस्या, आव्हाने आणि दृष्टिकोन' या विषयावर आयोजित आंतरराष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे मानद सचिव विजयसिंह बोंद्रे होते. कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, वातावरणातील बदलामुळे पिकांच्या उत्पादन क्षमतेत घट होत आहे. त्यासाठी शेतकऱ्याने शेतीत विविध प्रयोग करत उत्पादन वाढविले पाहिजे. शिवाजी विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे म्हणाले, शिक्षणाबरोबर शेतीचाही विकास होणे गरजेचे आहे.



**कोल्हापूर : आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात बोलताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, विजय बोंद्रे, डॉ. डी. आर. मोरे, स्कॉट कफोरा, डॉ. प्रवीण सप्तर्षी आदी. (छाया : नाज ट्रेनर)**

बीजभाषक डॉ. प्रवीण सप्तर्षी म्हणाले, सध्या ग्रामीण विकास होऊ नये यासाठी एक यंत्रणा कार्यरत असल्याने शेतकऱ्याने घेतलेल्या उत्पादनाला योग्य हमीभाव मिळत नाही. गोकुळचे चेअरमन विश्वास पाटील म्हणाले, गोकुळ दूध क्रांतीमुळे जिल्ह्यात एकही आत्महत्या झाली नाही. ग्रामीण विकासात गोकुळचेही योगदान महत्वाचे आहे.

स्कॉट कफोरा यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी ई-जर्नलचे प्रकाशन झाले. स्वागत प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांनी केले, प्रास्ताविक प्रा. आर. एम. कांबळे यांनी केले. डॉ. डी. एल. काशीद यांनी आभारमानले. यावेळी संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे, बाळासाहेब खाडे, उदय पाटील, सत्यजित पाटील, बी. एन. गोफणे, डॉ. एस. एस. पन्हाळकर, प्रा. डॉ. प्रबीर कुमार रथ आदी उपस्थित होते.

लोकमत

# कोल्हापूर हे राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक

## अभिनव देशमुख : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय एकात्मता परिषदेचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज यांचा वारसा लाभलेले कोल्हापूर हे राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक आहे, असे गौरवोद्गार जिल्हा पोलीस अधीक्षक अभिनव देशमुख यांनी काढले. देशभक्तीची शिकवण देणाऱ्या या शहरातून नवीन ऊर्जा घेऊन राष्ट्रीय एकात्मता टिकविण्यासाठी योगदान द्या, असे आवाहन त्यांनी युवकांना केले.

एनएसएस पुणे विभाग, केंद्र सरकारचा युवा कार्यक्रम आणि खेल मंत्रालयातर्फे कोल्हापुरात शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय एकात्मता शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. २१ डिसेंबरपर्यंत चालणाऱ्या या शिबिराचे उद्घाटन शनिवारी देशमुख यांच्या हस्ते रोपट्याला पाणी घालून झाले. वि. स. खांडेकर भाषाभवनात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे होते. शिबिरात राज्यातील १०, तर केरळ, कर्नाटक व त्रिपुरातील प्रत्येकी एक अशा एकूण १३ विद्यापीठांनी सहभाग घेतला आहे.

देशमुख म्हणाले, देशात विविधता असतानाही एकता आहे. ती लोकशाहीमुळे टिकून राहिली आहे. कोल्हापूर हे महाराष्ट्रातील प्रमुख केंद्र आहे. कोल्हापूरला समृद्ध असा ऐतिहासिक शौर्याचा वारसा लाभला आहे.

शिवाजी महाराज आणि शाहू महाराजांनी आपल्या विचाराने देशभक्ती आणि एकात्मतेची बीजे येथे रोवली. आताच्या तरुणाईने हा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून देशाची अखंडता कायम राहावी यासाठी योगदान देण्याची गरज आहे. या शिबिराच्या माध्यमातून एकात्मतेची नवीन ऊर्जा मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. कोल्हापुरात आला आहात तर येथील कोल्हापुरी चप्पल बघा, फेटा पहा, सर्वत्र फिरा, आनंद घ्या, असे आवाहनही त्यांनी केले.

'एनएसएस'चे संचालक डॉ. डी. के. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. यावेळी प्र-कुलगुरू डी. टी. शिर्के, वित्त लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, उपकुलसचिव व्ही. एन. शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे पुणे विभाग संचालक डी. कार्तिकेयन उपस्थित होते.






कोल्हापुरात शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय एकात्मता शिबिराचे उद्घाटन शनिवारी झाले. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक अभिनव देशमुख यांनी मार्गदर्शन केले. दुसऱ्या छायाचित्रात विद्यापीठ परिसरात आपापल्या प्रदेशांतील पारंपरिक वेशभूषेसह आपली छबी टिपण्यात विद्यार्थी दंग झाल्याचे चित्र दिसत होते.

### विद्यापीठाच्या प्रांगणात संस्कृती एकवटली

राष्ट्रीय एकात्मता शिबिराच्या निमित्ताने विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारापासून भाषा भवनपर्यंत रॅली काढण्यात आली. यात १३ विद्यापीठांतील सहभागी विद्यार्थ्यांनी विविध पारंपरिक वेशभूषा करुन देशभरातील विविध प्रांतांतील लोकसंस्कृतीचे दर्शन घडवले. मर्द मराठा मावळ्यांपासून ते आदिवासी पाड्यातील लोकसंस्कृती या रॅलीच्या निमित्ताने विद्यापीठाच्या प्रांगणात एकवटली. या रॅलीने विद्यापीठातील वातावरणात देशभक्तीचे रंग भरले.

हे शिबिर आठ दिवस चालणार आहे. आज हे सर्व विद्यार्थी पन्हाळा किल्ला व न्यू पॅलेसला भेट देऊन कोल्हापुरातील ऐतिहासिक वारसा पाहणार आहेत.

### उत्कृष्ट संयोजनाचे कौतुक

राष्ट्रीय एकात्मता शिबिर संयोजनाची जबाबदारी पहिल्यांदाच कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाला मिळाली आहे. विद्यापीठानेही यजमानपदाला साजेसे संयोजन केल्याने देशभरातील तीन आणि राज्यभरातील १० अशा १३ विद्यापीठांतून आलेले २१० विद्यार्थी प्रतिनिधी कोल्हापूरच्या प्रेमात पडले. त्यांनी उत्कृष्ट संयोजनाचे कौतुक केले.

# संस्कृतीचा अभ्यास व्यक्तिमत्त्वासाठी आवश्यक

## पोलीस अधीक्षक अभिनव देशमुख यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

देशातील विविध प्रांतातील संस्कृतीचा एकत्रितपणे अभ्यास करणे हे युवकांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी अत्यंत गरजेचे आहे, असे प्रतिपादन पोलीस अधीक्षक अभिनव देशमुख यांनी केले.

राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रीय कार्यालय, युवा आणि खेल मंत्रालय, भारत सरकार व शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'राष्ट्रीय एकात्मता शिबिरा'च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

पोलीस अधीक्षक देशमुख म्हणाले, एनएसएसचे उपक्रम नेहमीच उल्लेखनीय असतात. लोकांमध्ये मिसळून विविध ठिकाणची संस्कृती अभ्यासण्याची संधी या मध्यमातून देशातील युवकांना प्राप्त होते. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनाचे क्षेत्रीय संचालक डी. कार्तिकेयन म्हणाले, एनएसएसच्या माध्यमातून देशपातळीवर युवाशक्तीला संघटितपणे मार्गदर्शन करण्याचे कार्य केले जाते. या शिबिरांमधून युवकांच्या अंगभूत कलागुणांना वाव मिळतो. एनएसएस हे देशपातळीवरील फार मोठे कुटुंब आहे. आज, या कुटुंबामध्ये चाळीस लाखांहून अधिक युवाशक्तीची मूठ बांधण्याचे कार्य झालेले आहे.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेच्या 'राष्ट्रीय एकात्मता शिबिरा'च्या उद्घाटनप्रसंगी बोलताना पोलीस अधीक्षक अभिनव देशमुख. सोबत अन्य मान्यवर.**

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, भारत देश हा विशाल सांस्कृतिक ठेवा जपणारे केंद्र आहे. राष्ट्रीय एकतेमुळेच आपली एक वेगळी ओळख निर्माण झालेली आहे. धार्मिक, सांस्कृतिक विचारधारा भिन्न असूनही आपणास एकसंध राहण्यासाठी एनएसएसचे विविध उपक्रम बळकटी प्राप्त करून देतात. या शिबिरात महाराष्ट्रासह कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा, गुजरात, तामिळनाडू, पदुच्चेरी, केरळ, राजस्थान, आसाम, गोवा आदी राज्यांतील विद्यापीठांचे संघ, शिबिरार्थी, संघव्यवस्थापक सहभागी झाले आहेत.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. चांगदेव बंडगर व प्रवीण साळोखे लिखित 'राष्ट्रीय सेवा योजना-संकल्पना व युवक विकास' या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तद्नंतर, राष्ट्रीय एकात्मता शिबिरासाठी तयार करण्यात आलेल्या डायरीचे प्रकाशन झाले. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, एनएसएसचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड, आर. सईदानायक, अजय शिंदे यांची उपस्थिती होती. एनएसएसचे समन्वयक डॉ. डी. जी. चिघळीकर यांनी आभार मानले.

पुढारी

# विविधतेत एकता भारताचे वैशिष्ट्य

## पोलिस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख : राष्ट्रीय एकात्मता शिबिरास प्रारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. प्रत्येक प्रांत, भाषेची वेगळी ओळख आहे. आपली लोकशाही हे देशाचे बलस्थान आहे. त्यामुळेच विविधतेतून एकता हे भारतीय लोकशाहीचे वैशिष्ट्य असल्याचे प्रतिपादन पोलिस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख यांनी शनिवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठामध्ये राष्ट्रीय एकात्मता शिबिराचा प्रारंभ त्यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. वि. स. खांडेकर भाषाभवन येथे झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

डॉ. देशमुख म्हणाले, आपल्या देशाइतकी सांस्कृतिक व भौगोलिक विविधता दुसऱ्या कोणत्याही देशाकडे नाही. हे आपले वैभव आहे. कोल्हापूर हे महाराष्ट्राचे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक केंद्र आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि राजर्षी शाहू महाराजांच्या पराक्रमी इतिहासाच्या पाऊलखुणा कोल्हापूरमध्ये सर्वत्र आढळतात. कोल्हापुरी फेटा, चप्पल, तांबडा-पांढरा रस्सा अशा विविध वस्तू व गोष्टींची जगभर ओळख आहे. देशभरातून आलेल्या विद्यार्थ्यांनी कोल्हापूरची संस्कृती समजावून घ्यावी.




**कोल्हापूर : राष्ट्रीय एकात्मता शिबिराच्या प्रारंभापूर्वी विविध विद्यापीठ संघांचा सहभाग असणारी एकता रॅली शिवाजी विद्यापीठ कॅम्पसमधून काढण्यात आली. (छाया : नाज ट्रेनर)**

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, राष्ट्रीय एकात्मतेचे बीज हे विद्यार्थीदशेतच रुजवले पाहिजे.

कारण, या तरुणांच्या खांद्यावरच देशाचे उद्याचे सुंदर भविष्य साकारणार आहे. कार्यक्रमास प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, सयदा नायक आदी उपस्थित होते. एनएसएसचे पुणे विभागीय संचालक डी. कार्तिकेयन यांचे भाषण झाले. डॉ. डी. के. गायकवाड यांनी स्वागत केले.

### सांस्कृतिक रॅलीने रंगत आणली

*कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा, गुजरात, तामिळनाडू, पाँडेचरी, केरळ, राजस्थान, आसाम, गोवा आदी दहा राज्यांतील विद्यापीठांच्या सहभागी संघांनी कार्यक्रमापूर्वी शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीपासून रॅली काढली. या रॅलीतील विद्यार्थ्यांनी विविध प्रांतांची ओळख दर्शविणारे पोषाख परिधान केले होते. विद्यापीठाच्या संघाने भगवे फेटे व पारंपरिक पोषाख घातला होता. यावेळी रॅलीत 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' अशा घोषणा देण्यात आल्या. रॅलीत सर्व मान्यवर सहभागी झाले होते.*

लोकमत

दीपक जाधव




**लक्षवेधी राष्ट्रीय एकात्मता रॅली :** कोल्हापुरात शिवाजी विद्यापीठात आयोजित राष्ट्रीय एकात्मता शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी काढण्यात आलेल्या रॅलीत राज्यभरातून आलेल्या १३ विद्यापीठांतील विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेसह सहभाग घेतला.

सकाळ




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शनिवारी राष्ट्रीय एकात्मता शिबिरास सुरुवात झाली. शिबिरात विविध प्रांतांतील विद्यार्थ्यांनी पारंपरिक पेहरावात शोभायात्रा काढली. यातून राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडवले गेले. (मोहन मेस्त्री : सकाळ छायाचित्रसेवा)

# विभिन्नतेत एकता, हीच विशेषता....

## राष्ट्रीय एकात्मता शिबिरास प्रारंभ

कोल्हापूर, ता. १५ : केरळमधील लुंगी, राजस्थानची पगडी, त्रिपुरातील घोळदार साडी आणि गुजराती घागरा अशा पारंपरिक वेशातील विद्यार्थी शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणात पाहायला मिळाले. राष्ट्रीय एकात्मता शिबिरानिमित्त दहा राज्यातील सुमारे दोनशे विद्यार्थी विद्यापीठात आले आहेत. दुपारी ४ वाजता या विद्यार्थ्यांनी त्यांच्या राज्याच्या पारंपरिक पोशाखात शोभायात्रा काढली. वेगवेगळ्या प्रांतांतील घोषणांनी विद्यापीठाचा परिसर दणाणून गेला. विभिन्नतेत एकता हीच आमची विशेषता हा संदेश त्यांनी यातून दिला.

केंद्रीय युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय यांच्या वतीने दरवर्षी राष्ट्रीय एकात्मता शिबिराचे आयोजन केले जाते.

पान २ वर »

सकाळ

# विभिन्नतेत एकता, हीच विशेषता....

» पान १ वरून

यावर्षी शिबिर शिवाजी विद्यापीठामध्ये १५ ते २१ डिसेंबर या कालावधीत होणार आहे. यामध्ये महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, राजस्थान, गुजरात, पाँडेचरी, तमिळनाडू, केरळ, गोवा, त्रिपुरा या राज्यांतून सुमारे २०० विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

महाराष्ट्रातील सात विद्यापीठांतील विद्यार्थी शिबिरास आले आहेत. आज शोभायात्रेने शिबिराला सुरवात झाली. दुपारी ४ वाजता विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोरून शोभा यात्रा निघाली. यामध्ये सर्व विद्यार्थी पारंपरिक पोषाख परिधान करून सहभागी झाले होते. महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनी वारकरी, जोतिबाची सासनकाठी नेणारे भक्त, लोककला कलाकार यांच्या वेश परिधान केला होता. वि. स. खांडेकर भाषा भवन येथे उद्‌घाटन कार्यक्रम झाला. यावेळी प्रा. प्रवीण साळोखे, प्रा. चांगदेव बंडगर यांनी लिहिलेल्या 'राष्ट्रीय सेवा योजना संकल्पना व युवक विकास' या पुस्तकाचे प्रकाशन केले. तसेच शिबिराच्या डायरीचे प्रकाशनही झाले. कार्यक्रमाच्या सुरवातीला राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डी. के. गायकवाड यांनी केले. यावेळी कुलगुरू देवानंद शिंदे, एन.एस.एस.चे क्षेत्रीय समन्वय डी. कार्तिकेयन, प्रकुलगुरू डी. टी. शिर्के, डी. आर. मोरे, व्ही. एम. शिंदे हे उपस्थित होते.

## लोकशाहीमुळेच हा देश एकसंध : डॉ. देशमुख

**देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावर इंग्लडचे तत्कालीन पंतप्रधान विस्टन चर्चिल यांनी हा देश एकसंध राहणार नाही, असे भाकित केले होते. कारण आपल्या देशामध्ये २८ राज्ये, २४ राज्य भाषा, दोन हजार बोली भाषा, आहार, विहार, पोशाख यातील भिन्नता यामुळे देशाची एकात्मता टिकणार का, अशी स्थिती होती; मात्र चर्चिल यांचे भाकित आपण खोटे ठरवले. लोकशाही शासन प्रणालीमुळेच ही एकसंधता टिकू शकली आहे. सनदी सेवा, रेल्वे, बॉलिवूड यांच्यामुळेही देशात एकात्मतेचे वातावरण निर्माण झाले आहे. ही एकसंधता टिकवण्यासाठी आपण अभिनिवेश विसरून एक झाले पाहिजे. यासाठी अशा प्रकारचे शिबिर उपयुक्त आहे.''**






**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित राष्ट्रीय एकता शिबिरासाठी देशभरातून विविध विद्यापीठांचे प्रतिनिधी त्या त्या राज्यांच्या पारंपरिक वेषभूषेत उपस्थित होते. दुसऱ्या छायाचित्रात राज्यातील विविध विद्यापीठांतून आलेल्या विद्यार्थ्यांनी लक्षवेधी वेशभूषा केल्या होत्या.** ( मोहन मेस्त्री : सकाळ छायाचित्रसेवा)







कोल्हापूर : शिबिरात सहभागी झालेले १) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. २) तामिळनाडू विद्यापीठाचे विद्यार्थी.

(सर्व छाया : एस. अली)

# संस्कृतीतून देशाच्या एकात्मतेचे दर्शन

**(पान १ वरून)** 'हर हर महादेव'च्या गजरात या फेरीस सुरुवात झाली. तर शिवाजी विद्यापीठाचा संघ हलगीच्या तालावर आणि 'जोतिबाच्या नावानं चांगभलं'चा गजर सासनकाठी नाचवत फेरीमध्ये सहभागी झाले होते.

## कोल्हापूर आपलसं वाटतं



या पूर्वीही एनएसएस कॅम्पसाठी शिवाजी विद्यापीठामध्ये आले होते. तेव्हापासून शिवाजी विद्यापीठाविषयी आपुलकी वाटत होती. या शिबिराच्या माध्यमातून देशातील विविधतेचे दर्शन घडते. मात्र या विविधतेतून ही एकता आहे, याची अनूभूतीही यातून घडते. कोल्हापूरने अस्सल मराठी संस्कृती जपली आहे. त्यामुळे कोल्हापूर आपलंस वाटतं.

**– अलमास खान,**
डॉ. आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## कोल्हापूर इज ब्युटीफूल



एनएसएसच्या या शिबिरामुळे प्रथमच कोल्हापूरसारख्या शहरामध्ये येण्यास मिळाले. शिबिराला येणार म्हटल्यावर कोल्हापूरविषयी माहिती घेण्यास सुरुवात केली होती. कोल्हापूरला मोठ्या सांस्कृती आणि ऐतिहासिक वारसा आहे. शिबिराचे आयोजनही उत्तम आहे. शिवाजी विद्यापीठामधील हिरवळ पाहून मन प्रफुल्लित होते. येथील वातावरण पाहून 'कोल्हापूर इज ब्युटीफूल' असेच म्हणावे लागेल.

**– तमाम मुबारिया,** पदुचरी युनिव्हर्सिटी

## उत्सुकता शिगेला



शिबिराला येणार हे ठरल्यापासूनच उत्सुकता शिगेला पोहोचली. यापूर्वी एनएसएसमधील काही सीनिअर कोल्हापूरला आले होते. त्यांनी कोल्हापूरविषयी खूप माहिती दिली आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठ या विषयी उत्सुकता निर्माण झाली. कालच आम्ही येथे पोहोचलो, येथील लोक आणि परिसर खूप छान आहे. पुढील सात दिवसांत देशाच्या संस्कृतीचा वारसा घेऊन जाणार आहोत.

**– शांती ब्रत दाश,** त्रिपुरा विद्यापीठ

## संस्कृतीची देवाणघेवाण



देशभरातील १३ विद्यापीठातील २०० विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि त्यांचे टीम लिडर या शिबिरामध्ये सहभागी झाले आहेत. पुढील सात दिवसांत या तरुण-तरुणींमध्ये सांस्कृतिक देवाणघेवाण होणार आहे. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मततेची भावना वाढीस लागणार आहे. या शिबिरातून पूर्ण देशाच्या संस्कृतीचे दर्शनही घडणार आहे. शिवाजी विद्यापीठाने शिबिराचे नेटके आयोजन केले आहे.

**– डी. कार्तिकेयन,** क्षेत्रीय संचालक, एनएसएस



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे आयोजित राष्ट्रीय एकात्मता शिबिरात पारंपरिक वेशभूषा परिधान करून विविध राज्यातून सहभागी झालेल्या विद्यार्थिनी. (सर्व छाया : एस. अली)

# संस्कृतीतून देशाच्या एकात्मतेचे दर्शन

## शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय एकात्मता शिबिरात १३ राज्यांतील विद्यार्थी सहभागी

कोल्हापूर / प्रतिनिधी :

**राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रीय कार्यालय, युवा आणि खेल मंत्रालय, भारत सरकार व शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठात सुरुवात करण्यात आलेल्या राष्ट्रीय एकात्मता शिबिरात देशाच्या एकात्मतेचे दर्शन घडले. पुढील सात दिवस भाषा, संस्कृती, इतिहास आणि विचारांची देवाण-घेवाण या माध्यमातून होणार आहे.**

या राष्ट्रीय एकात्मता शिबिरात कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा, गुजरात, तामिळनाडू, पदुच्चेरी, केरळ, राजस्थान, आसाम, गोवा आदी ११ राज्यांतील २०० विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

सायंकाळी ५ वाजता शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीपासून एकात्मता फेरी काढण्यात आली. या फेरीमध्ये देशभरातून आलेले तरुण - तरुणी आपआपल्या संस्कृतीचे दर्शन घडवत पारंपरिक वेशभूषेमध्ये सहभागी झाले होते. 'जय शिवाजी, जय भवानी' आणि

▸▸ पान २ वर

### देशाच्या संस्कृतीचे दर्शन



देशभरातील संस्कृतीचे दर्शन एनएसएसच्या उपक्रमातून घडणार आहे. संस्कृती, इतिहास येथे पहायला मिळेल. त्याच बरोबर प्रमुख प्रश्नांची ही जाणीव येथे होणार आहे. या प्रश्नांच्या सोडवणुकीमध्ये तरुणाईची मोठी भूमिका असणार आहे. त्याचबरोबर कोल्हापूरच्या संस्कृतीची माहिती देशभरातून आलेल्या विद्यार्थ्यांना देणार आहोत.

**- हर्षली जाधव, शिवाजी विद्यापीठ**



कोल्हापूर : एकात्मता फेरीमध्ये सहभागी झालेला शिवाजी विद्यापीठाचा संघ.

16 DEC 2018
तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राष्ट्रीय एकात्मता रॅलीतून भारतीय संस्कृतीचे दर्शन

## शिवाजी विद्यापीठात सात दिवसीय राष्ट्रीय एकात्मता शिबिराचे उद्घाटन : १३ राज्यातील २०० विद्यार्थ्यांचा समावेश






**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रीय एकात्मता रॅलीचे उद्घाटन करताना पुणे विभागीय संचालक डी. कार्तिकेयन. सोबत डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. व्ही. एन. शिंदे, पुणे येथील राष्ट्रीय सेवा योजनाच्या क्षेत्रीय कार्यालयाचे अधिकारी अजय शिंदे, अशोक मदेकर, अभिनव डोंगरे, सईदा नाईक, विष्णू खाडे, मधुकर पाटील उपस्थित होते. दुसऱ्या छायाचित्रात एकात्मता रॅलीत मराठमोळ्या संस्कृतीचे दर्शन. (छाया : रियाज ट्रेनर)**

प्रतिनिधी
कोल्हापूर

राष्ट्रीय एकात्मता वृध्दीवाढीसाठी १५ ते २१ डिसेंबर दरम्यान शिवाजी विद्यापीठातील आयोजित शिबिरातील एकात्मता रॅलीचे उद्घाटन पुणे विभागीय संचालक डी.कार्तिकेयन यांच्या हस्ते करण्यात आले. या एकात्मता फेरीमध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणा, गुजरात, तामिळनाडू, पदुचरी, केरळ, राजस्थान, आसाम, गोवा याराज्यातील विद्यापीठाचे संघ सहभागी झाले होते. सर्व संघांनी पारंपरिक वेशभूषा करून आपआपल्या राज्यातील विविध संस्कृतीचे दर्शन घडवले. रॅलीला मुख्य इमारतीपासून सुरु होऊन लेडीज हॉस्टेल, हेल्थ सेंटर, परीक्षा विभाग, वनस्पतीशास्त्र विभागामार्गे वि. स. खांडेकर भाषा भवन येथे सांगता झाली.

एकात्मता फेरीच्या माध्यमातून एकात्मतेचा संदेश दिला. रॅलीत सहभागी संघानी आपआपल्या कला, संस्कृतीचे दर्शन घडवले. जय भवानी, जय शिवाजी, हरहर महादेव अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. प्रत्येक संघात ५ मुले व ५ मुलींचा समावेश आहे. शिवाजी विद्यापीठ संघाने सासण काटी नाचवली. तसेच हलगीच्या कडकडाटात रॅली पुढे सरकत होती. काही विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मावळ्यांची केलेली वेशभूषा सर्वांचे लक्ष वेधून घेत होती.

सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कला सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, डॉ. डी. आर. मोरे, डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. व्ही. एन. शिंदे, अजय शिंदे, मधुकर पाटील, विष्णू खाडे, अशोक मदेकर, आदी उपस्थित होते..

### संस्कृतीची देवाण-घेवाण होणार

राष्ट्रीय एकात्मता शिबिरात १३ राज्यातील २०० मुल-मुली एकत्र आले आहेत. या शिबिरात देशभरातील विविध प्रांतातील संस्कृतीची देवाणघेवाण होईल. तसेच राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढीस लागेल. शिवाजी विद्यापीठातील नेटके नियोजन आणि परिसरातील जैवविविधता पाहून भारावून गेलो आहे.

**-डी. कार्तिकेयन (पुणे विभागीय संचालक )**



**गोवा राज्यातील मुलींनी केलेली पारंपरिक वेशभूषा लक्षवेधी ठरली.**

16 DEC 2018

महाराष्ट्र टाइम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विविधतेतून राष्ट्रीय एकतेचे दर्शन





'राजस्थानी' पेहराव करत राजस्थानातील विद्यार्थ्यांनी वेगळपण जपत फोटोसेशन करत आनंदही लुटला. दुसऱ्या छायाचित्रात राष्ट्रीय एकात्मता शिबिराच्या उद्घाटन सोहळ्यात वेगवेगळ्या शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थिनींनी पारंपरिक पद्धतीने साड्या परिधान करत सहभागी झाल्या.

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

विद्यार्थ्यांनी परिधान केलेल्या वैशिष्ट्यपूर्ण वेशभूषा, विविध प्रांताच्या लोकसंस्कृतीवर आधारित सजीव देखावे, पारंपरिक वाद्यांचा गजर आणि 'छत्रपती शिवाजी महाराज की जय'चा जयघोष अशा जल्लोषी वातावरणात राष्ट्रीय एकात्मता शिबिराचा उद्घाटन सोहळा रंगला. राज्य आणि देशाच्या विविध प्रांतांतून एकवटलेल्या तरुणांनी विविध संस्कृतीचे सादरीकरण करताना ऐक्याचे दर्शन घडवले.

विद्यार्थ्यांच्या सळसळत्या उत्साहात रंगलेल्या या कार्यक्रमाच्या उद्घाटन सोहळ्यात जिल्हा पोलिस अधीक्षक अभिनव देशमुख यांनी 'कोल्हापूरच्या मातीतून देशभक्तीची शिकवण व विधायक कार्यासाठी नव उर्जा लाभेल. त्या बळावर विद्यार्थी मित्रांनो, स्वतःचा व्यक्तिमत्व विकास घडवा आणि राष्ट्र उभारणीत योगदान द्यावे.' अशा शब्दांत युवक युवतींमध्ये स्फुलिंग चेतवले. राष्ट्रीय सेवा योजना विभागीय संचालनालय पुणे आणि शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय एकात्मता शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते.

विद्यापीठातील भाषाभवन सभागृहात शनिवारी सायंकाळी शिबिराचा उद्घाटन सोहळ्याचा कार्यक्रम रंगला. याप्रसंगी शिबिराच्या डायरीचे व प्रा. चांगदेव बंडगर, प्रा. प्रवीण साळुंखे लिखित 'राष्ट्रीय सेवा योजना : संकल्पना व युवक विकास' पुस्तकाचे प्रकाशन झाले. पोलिस अधीक्षक देशमुख म्हणाले, 'छत्रपती शिवाजी महाराज व राजर्षी शाहू महाराज यांचा वारसा कोल्हापूरला लाभला आहे. ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रात हे शहर 'आयकॉन'म्हणून ओळखले जाते. राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे तरुणाईच्या विधायक दृष्टिकोनाचा व रचनात्मक कार्याचा आविष्कार आहे. विद्यार्थ्यांच्या श्रमशक्तीतून गावोगावी झालेल्या रचनात्मक कार्यामुळे राष्ट्रीय सेवा योजनेची नवी ओळख बनली आहे.' याप्रसंगी व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, वित्त व लेखाअधिकारी व्ही.टी.पाटील, शैक्षणिक सल्लागार

## मिरवणुकीने भरला उद्घाटन सोहळ्यात रंग

उद्घाटन सोहळ्याच्या प्रारंभी विद्यापीठातील मुख्य इमारतीपासून मिरवणूक निघाली. विद्यार्थ्यांच्या वेगवेगळ्या वेशभूषा, विविध प्रांताच्या लोकसंस्कृतीवर आधारित सजीव देखावे आणि सासनकाठी हे मिरवणुकीचे आकर्षण ठरले. सहभागी विद्यार्थ्यांनी कोल्हापुरी फेटे परिधान केले होते. हलगीचा ठेका व पारंपरिक वाद्यांच्या तालावर विद्यार्थी, विद्यार्थिनींनी नृत्याचा फेर धरला. राष्ट्रीय सेवा योजना पुणे विभागाचे संचालक डी. कार्तिकेयन, प्रभारी कुलसचिव व्ही. एन. शिंदे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. डी. के. गायकवाड, सिनेट सदस्य प्रा. मधुकर पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत मिरवणूक निघाली. १५ ते २१ डिसेंबर या कालावधीत विविध कार्यक्रमांचे सादरीकरण होणार आहे. शिबिरात राज्य आणि देशातील मिळून १३ विद्यापीठातील शेकडो विद्यार्थ्यांना सहभाग नोंदवला आहे.

प्राचार्य डी.आर.मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.